क्र.साप्रवि/रवका/न.क्र.१२/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.

**महावितरण**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

# प्रशासकीय परिपत्रक क्र. १८८ दिनांक ०७ / ११ / २००८

विषय : खाजगी रुग्णालये महावितरण कंपनीच्या मान्यताप्राप्त सूचिवर समाविष्ट करण्याबाबत.
संदर्भ : सा.आ. क्र.२० दि. १७.०६.१९६३.

.....

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित मधील कर्मचाऱ्यांना सा.आ.क्र.२० (क) दि.१७.६.१९६३ (वेळोवेळी सुधारित केलेल्या) मध्ये समावेश असलेल्या गंभीर/शस्त्रक्रिया आजारावरील उपचार तथा त्यावरील कांही खाजगी रुग्णालयांमध्ये उपचार करुन घेतल्यास त्याप्रित्यर्थ होणा-या खर्चाची कंपनीकडून प्रतिपूर्ती मिळण्याची सुविधा उपलब्ध करण्यासाठीचा प्रस्ताव महावितरण कंपनीच्या विचाराधीन होता.

२. मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त) व संचालक (संचलन) यांच्याशी विचारविनिमय करुन निम्ननिर्देशित खाजगी रुग्णालयात त्यांच्या नावासमोर रकाना क्र.४ मध्ये नमूद केलेल्या गंभीर/शस्त्रक्रिया कराव्या लागणा-या आजारांवर उपचार करुन घेता येणे त्या त्या भागातील कर्मचाऱ्यांना सोयीस्कर व्हावे म्हणून सदर रुग्णालये महावितरण कंपनीच्या मान्यताप्राप्त सूचीवर घेण्यासाठी मंजुरी दिली आहे.

| अ.क्र. | रुग्णालयाचे नाव | ठिकाण | उपचारासाठीचे गंभीर/शस्त्रक्रिया करावे लागणारे आजार |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | **लाईफ लाईन हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटर** | **पनवेल** | **हृदयविकार, अस्थिरोग, मेंदूविकार आणि मणक्यावरील उपचार व त्यावरील शस्त्रक्रिया** |
| २. | **सूरज हॉस्पिटल ॲण्ड डायग्नोस्टिक सेंटर** | **सानपाडा नवी मुंबई** | **मेंदू व मणक्यावरील उपचार व त्यावरील शस्त्रक्रिया** |

३. महावितरण कंपनीमधील कर्मचाऱ्यांनी उपरोल्लेखित कोणत्याही रुग्णालयात/संस्थेमध्ये त्यांच्या नावासमोर दर्शविलेले आजार/शस्त्रक्रिया याबाबत उपचार करून घेतल्यास त्यांना नियमानुसार वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील.

४. महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी सदरच्या रुग्णालयात संबंधित आजारांसाठी उपचार/शस्त्रक्रिया करुन घेतल्यास रुग्णालयाच्या मूलभूत दर आकरणीच्या (Basic Hospital Charges) १० % सवलत रुग्णालयाकडून मिळेल, तसेच रुग्णालयाने कळविलेली दरसुची पुढील तीन वर्षासाठी कायम राहील.

५. सा.आ.क्र.२०(क) दिनांक १७/६/१९६३ मधील वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या संदर्भातील इतर अटी व तरतूदी अबाधित राहतील.

६. सदर प्रशासकीय परिपत्रक निर्गमित केलेल्या तारखेपासून अंमलात येईल.

७. सदर परिपत्रक www.mahadiscom.in या कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

(सु. य. पाटील)
*मुख्य महाव्यवस्थापक (क)*

प्रति
महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे

*D:\O&M\Adm.Cir - Medical.doc*